


मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे

# सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव



आयोजित

आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद

# शेतक-यांच्या आत्महत्या : वास्तव, कारणे व उपाय

दि. २७ सप्टेंबर २०१६



**संयोजक**

समाजिक शास्त्रे विभाग

**सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव**

ता.माजलगाव जि.बीड ४३१ १३१

E-mail : majalgaon_college123@yahoo.in

RADHEYA PUBLICATION

ISBN No. 978-1-63535-675-5

Scanned by CamScanner

## अणुक्रमणिका


| अ.क्र. | शोधनिबंधाचे शिर्षक | प्राध्यापकांचे/संशोधक विद्यार्थ्याचे नाव | पेज नंबर |
|---|---|---|---|
| ०१ | शेतकऱ्यांच्या आत्महत्या: समाजशास्त्रीय विश्लेषन | प्रा. साहेबराव हिवाळे | ०१ |
| ०२ | मराठी कविवतेतील शेतकरी जीवन | प्रल्हाद दत्तराव भोपे | ०७ |
| ०३ | मराठवाड्यातील गोदावरी खोऱ्याचे चिकित्सक अध्ययन | डॉ. ज्ञानेश्वर जिगे | ११ |
| ०४ | "A GEOGRAPHICAL ANALYSIS OF PROBLESM RELATED TO AGRICULTURE OF THE BEED DISTRICT" | Dr.Jaideep R.Solunke | १८ |
| ०५ | Gobalization and Farmers Suicide in India | Dr. Vandana M. Mahure | २२ |
| ०६ | "शेतकऱ्यांच्या आत्महत्या : समाजशास्त्रीय विश्लेषण" | प्रा. आर.बी. काळे,प्रा.मोरे जि.एन. | २६ |
| ०७ | जागतिकीकरण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या | प्रा.डॉ. बी.एन.कावळे | ३० |
| ०८ | Marathwada drought present status and its Effects | Dr. R.T. Pawar | ३२ |
| ०९ | जागतिकीकरण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या | प्रा. गवळी देवीदास गोकुळ | ३५ |
| १० | Indian farmers Problems and their Possible Solutions | Dr. Sunil H. Patil | ३९ |
| ११ | Problems of Indian Farmers: A Critique | Prof. Phulari V.S. | ४५ |
| १२ | शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक सामाजिक समस्या | प्रा. काळवणे प्रकाश साहेबराव | ५० |
| १३ | ग्लोबल व्हिलेजचे समग्रलक्षी वास्तव : पांढर | श्री. रामनाथ श्रीपती फुटाणे | ५३ |
| १४ | मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारण आणि उपाय | प्रा. ठोंबरे मधुकर दत्तात्र्य | ५७ |
| १५ | शेतकऱ्यांच्या आत्महत्या व उपाययोजना | डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण | ५९ |
| १६ | भारतीय किसानों की समस्यांऐ और प्रेमचंद | डॉ. प्रकाश खुळे | ६२ |
| १७ | शेतकरी आत्महत्या आणि मराठी साहित्यातील कादंबरी | प्रा.डॉ.सदाशिव हरिभाऊ सरकटे | ६५ |
| १८ | 'शेती' समृद्ध आणि 'शेतकरी' आर्थिकदृष्ट्या परिपुर्ण होण्यासाठी उपाय | डॉ.भागवत मा.वाघ | ६८ |
| १९ | शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि उपाय - योजना | प्रा. सूर्यवंशी गणेश दामाजी | ६९ |
| २० | "शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे आणि उपाय" | डॉ. नंदकुमार मुळे | ७२ |
| २१ | शेतकरी आत्महत्या आणि मराठी कविता | दौंडे अशोक जनार्धन | ७५ |
| २२ | शेतकऱ्यांच्या आत्महत्याची कारणे व उपाय | डॉ.अमोलसींह दशरथसींह गौतम | ७९ |
| २३ | शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे आणि उपाय | प्रा. डॉ. बी.एम. नरवाडे | ८१ |
| २४ | शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे आणि उपाययोजना | प्रा.किशोर नरहरी काळे , शिवनंदा कुशेबा होळकर | ८३ |
| २५ | शेतकरी आत्महत्या आणि प्रशासन | उढाण सतीश रमेशराव | ८६ |
| २६ | शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे आणि उपाययोजना | राजपुत विलास भरतसिंग | ८८ |
| २७ | Farmer's Suicide in India - Causes and cure | Zunjare Ganesh Tulshiram | ९२ |
| २८ | शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक चिंतन | प्रा. राजेंद्र बोरसे | ९७ |
| २९ | महाराष्ट्रातील शेती : काल, आज, उद्या | प्रा.विनोद दत्तराव झाडे | ९९ |
| ३० | महात्मा जोतीराव फुले:शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि राजकारण | वाघमारे बेलाजी मेघराज | १०१ |
| ३१ | शेतकरी आत्महत्या : कारणे व उपाय | प्रा.घाटुळ महादेव सोपानराव | १०५ |
| ३२ | शेतकऱ्यांच्या आत्महात्येची कारणे व उपाय | तांबे संभाजी अंकुश | १०७ |
| ३३ | "जागतिकीकरण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या" | भगवान शिंदे | १०९ |
| ३४ | शेतकऱ्यांच्या आत्महत्तेची कारणे आणि उपाय | प्रा. डी. एम. शिंदे | ११३ |
| ३५ | भारतीय किसान और वैज्ञानिक दृष्टीकोन | डॉ. नळे बी. आर. | ११५ |
| ३६ | शेतकरी आत्महत्येचे सामाजिक पैलु | जयसिंग पी. सिंगल | ११७ |


Scanned by CamScanner

# "शेतकऱ्यांच्या आत्महत्या समाजशास्त्रीय विश्लेषण

6

प्रा.मोरे जि.एन.
समाजशास्त्र विभाग
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, सिल्लोड

प्रा. आर.वी. का
समाजशास्त्र विभा
र.भ.अट्टल महाविद्यालय, गेव

प्रस्तावना

भारत हा कृषीप्रधान देश आहे. देशाच्या मोठ्या लोकसंख्येला अन्नधान्य पुरविण्याचे काम शेती क्षेत्रातून केले जा याचाच अर्थ शेतकरी भारतातील जनतेला अन्नधान्य पुरवितो परंतु असे असले तरी आज शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी गंभ स्वरुप धारण केले आहे. महाराष्ट्र राज्य सुध्दा शेतकऱ्यांच्या आत्महत्येला अपवाद नाही. राज्यात सुध्दा शेतकरी आत्महत्या सत्र दिवसेंदिवस वाढत आहे. विशेषत: राज्यातील मराठवाडा, विदर्भ आणि खान्देशात आत्महत्यांच्या प्रमाणात वा ााली आहे.

कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य स्त्रोत आहे. एकूण राष्ट्रीय उत्पन्नानध्ये अर्धा वाटा शेतीचा आहे. त्या पशुपालन, जंगले, शेतीउद्योग इ. चा समावेश होतो. परंतु दुर्देवाने भारतीय कृषी मागसलेली आहे असे म्हणता येवु श "डॉ.क्लाउस्टन यांनी भारतीय शेतीच्या संदर्भात म्हटले आहे की, भारतात स्पृश्य असपृश्यता आणि मागास जाती आहेत त्याचबरोबर मागास उद्योगधंदे सुध्दा आहे दुर्देवाने शेती त्यापैकी एक आहे." भारतीय शेती निसर्गावर अवल असल्यामुळे निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीतून उत्पादन होत नसल्यामुळे वर्तमान काळात भारतीय शेतकऱ्यांच्या वा आत्महत्या केवळ चिंतनाची बाब नसून एक ज्वलंत समस्या किंवा राष्ट्रीय समस्या बनली आहे. भारतात उपहासाने म्हटले जाते की, 'भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो व कर्जातच मरण पावतो.'

उद्देश :

१. शेतकरी आत्महत्यांचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषन करणे.
२. शेतकरी आत्महत्याच्या कारणाचा शोध घेणे.
३. शेतकरी आत्महत्या होऊ नये यासाठी उपाययोजना सुचविणे.

तथ्य संकलन पध्दती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, मा वर्तमानपत्रे, इंटरनेट इ.

शेतकरी आत्महत्यांचे समाजशास्त्रीय विश्लेषण :

सामन्यपणे आत्महत्या एक व्यक्तीगत कारण मानले जाते. व्यक्ती स्वत: आपल्या इच्छेनुसार आपल्या मृत्यूचा करत असतो. प्रयत्नपूरक स्वत:चा मृत्यू घडवून आणतो. आत्महत्या ही प्रत्यक्षपणे एक व्यक्तीगत क्रिया आहे. परंतु वास्तव असे मात्र होत नाही. व्यक्तीच्या सर्व क्रिया एक प्रकारे व्यक्तीगत असतात, व्यक्तीगत आणि सामाजिक अंतर करणे शक्य नाही परंतु वैज्ञानिक दृष्टिकोणातून विचार केल्यास सहजतेने समजू शकते आपण ज्या क्रिया करतो त्या क्रिया साम असतात. आत्महत्या सुध्दा अशी क्रिया आहे की जी व्यक्तीवर सामाजिक परिस्थितीच्या दबावामुळे केली जाते. आत् ही वरवर पाहता वैयक्तीक वाटत असली, तरी विशिष्ट सामाजिक परिस्थिती व्यक्तीला आत्महत्या करण्यास बाध्य म्हणून आत्महत्या ही एक सामाजिक घटना ठरते.

इमिल दुर्खीम यांनी 'दी सुसाईड' या ग्रंथात आत्महत्येची सामाजिक दृष्टिकोनातून व्याख्या करतो. त्यांच्या 'प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे किंवा सकारात्मक किंवा नकारात्मक ज्या कृतीचा शेवट आत्मनाशात होतो अशी व्यक्ती घडणारी कोणतीही कृती म्हणजे आत्महत्या होय.' व्यक्तीने किंवा समूहाने केलेल्या आत्महत्येचे कारणे कोणतेही आत्महत्या ही त्या व्यक्तीच्या अंतिम क्रियेचा परिणाम असतो. दुर्खीमच्या मते आत्महत्या हे सामाजिक तथ्य आहे. मते आत्महत्येची घटना ही मानसिक किंवा व्यक्तीगत नाही. आत्महत्येला प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे सामाजिक घट सामाजिक परिस्थिती जबाबदार असते म्हणून आत्महत्या हे सामाजिक तथ्य किंवा सामाजिक वास्तव आहे.



Scanned by CamScanner

शेतकऱ्यांच्या आत्महत्या या दुर्खीमने सांगितलेल्या प्रमाणक शुन्य आत्महत्या या प्रकारामध्ये येतात. जेव्हा व्यक्तीच्या जीवनात अस्वभाविक रुपात काही परिवर्तन घडून येते व त्या बदलत्या परिस्थितीला सामोरे जाण्याचे अनुकूलन साधण्याचे सामर्थ्य जर व्यक्तीत नसेल तर अशा परिस्थितीत व्यक्तीने केलेला आत्मनाश हा बदलल्या परिस्थितीमुळे सामाजिक प्रमाणावरील विश्वास कमी होत जातो व प्रमाणशुन्य अवस्था येते याला कारणीभूत ठरतो व त्यातून व्यक्तीने केलेली आत्महत्या ही प्रमाणकशुन्य आत्महत्या ठरते. भारतातील कृषी ही निसर्गावर अवलंबून असल्या कारणामुळे दिवसेंदिवस पडत जाणारा दुष्काळ यामुळे शेतकऱ्याच्या जीवनात उद्भवलेले संकट यामुळे आर्थीक क्षेत्रात अचानक बदल होतो. आर्थीक क्षेत्रातील चढउतारामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात असंतुलीत स्थिती निर्माण होते व शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात.

शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे कारणे :

नैसर्गीक संकटे :

देशात विशेषतः महाराष्ट्रात वारंवार दुष्काळ परिस्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे पाण्याअभवानी शेतीचे नुकसान होत असून शेतकऱ्यांना उत्पन्नात तोटा सहन करावा लागत आहे. तसेच मागील काही वर्षापासुन गारपिटीच्या समस्येने महाराष्ट्रातील शेतकरी हवालदिल झाला आहे. महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती असून गारपीटीमुळे हाती येत असलेल्या पिकांचे / फळबागांचे नुकसान झालेल्या गावांची संख्या जास्त आहे. त्यामुळे अशा प्रकारचे नैसर्गिक संकटे शेतकऱ्यांच्या आत्महत्येला कारणीभुत ठरत आहे.

कर्जबाजारीपणा :

देशातील व महाराष्ट्रातील कर्जबाजारीपणा हे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कारण आहे. शेतीतून जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी सुधारीत बी-बीयाणे, जलसिंचन, रासायनिक खत, कीटकनाशके यासाठी शेतकरी कर्ज घेतात. उत्पादन होते ही परंतु कृषी मालाला अपेक्षित दर मिळत नसल्यामुळे कर्जाची परतफेड करण्यास शेतकरी असमर्थ ठरतात. त्यामुळे काही प्रसंगी जप्तीची कारवाई ओढवते. बऱ्याचदा बँकेकडून कर्ज उपलब्ध न झाल्यास खाजगी सावकाराकडून वेळेवर कर्ज घ्यावे लागते, ते कर्ज जास्त व्याजदराने घेतल्या गेल्यामुळे उत्पन्नातून सावकारी कर्जसुध्दा परत सुध्दा केले जात नाही अशा वेळेस खाजगी सावकार जमिनीची जप्ती करण्यास मागे-पूढे पाहत नाही. परिणामी शेतकऱ्यांना नैराश्याने ग्रासले जाते त्यातून शेतकरी आत्महत्येचे पाउल उचलतात.

पायाभुत सुविधाचा अभाव :

शेतीसाठी आवश्यक पायाभुत सुविधाचा अभाव खुप मोठया प्रमाणात ग्रामिण भागात पाहायला मिळतो. शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या वीज, पाणी, आधुनिक तंत्रज्ञान या सुविधांची कमतरता आहे. ज्या शेतीसाठी पाणी आहे त्या ठिकाणी भारनियमण असल्यामुळे शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्यात अडचणी निर्माण होत आहे. तसेच बियाणे कंपन्याकडून बनावट बियाणे जास्त किंमतीमध्ये शेतकऱ्यांना विकल्या जातात किंवा कृत्रीम तुटवडा निर्माण करुन जास्तीत जास्त किंमत वसुल केली जाते. शेतकरी बऱ्याचदा बनावट बियाणे आपल्या जमिनीत पेरणी करतो परंतु त्याची उगवण होत नाही त्यामुळे शेतकऱ्यांचे श्रम वाया जावून हाती काहीच येत नाही परिणामी शेतकऱ्यांना घरखर्च भागवल्या जात नाही त्यामुळे आत्महत्येचा वाईट विचार शेतकरी करु लागतो त्या विचारातून तो आत्महत्या करतो.

शासनाची उदासिनता :

शेतीच्या उत्पन्नातून कर्जाची परतफेड न झाल्याने शेतकऱ्याकडे कर्जाची थकबाकी तशीच राहिल्याने शेतकरी आत्महत्या करतात. अशा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूंबाला शासनाकडून मदत केली जाते परंतु ही मदत अतिशय कमी असल्याने पीडित कुटूंब आपला उदारनिर्वाह कसा करणार, आपल्या अत्यावश्यक गरजा कशा भागवणार असा प्रश्न उपस्थित होतो. तसेच दुष्काळाच्या आधारावर शेतकऱ्याच्या शेतीच्या आधारावर त्यांना मदत करत असते परंतु त्यात भेदभाव होत असल्याने आपल्याला दिसते तसेच तो दुष्काळ निधी शेतकऱ्यांना वेळेवर वाटप होत नाही अशा प्रकारची शासनाची उदासिनता शेतकऱ्यांच्या आत्महत्येला प्रवृत्त करतात.

राष्ट्रीय नमुना पाहणी सर्व्हेच्या **National Sample Survey Organisation-Nsso** ७० व्या फेरीत (जी २०१२-१३ मध्ये पार पाडली) देण्यात आलेल्या आकडेवारीनुसार सन २०१२-१३ मध्ये देशात ९०.२ दशलक्ष इतकी शेतकरी कुटूंबे आहेत. तसेच देशामधील ग्रामीण कुटूंबापैकी ५७.८% इतकी संख्या शेतकरी कुटूंबाची आहे. परंतु असे असले तरी आज



Scanned by CamScanner

देशामध्ये वरील अनेक कारणामुळे शेतकरी आत्महत्याचे प्रमाण वाढले आहे. २००१ ते २०१४ पर्यंत १७,२७६ शेतकऱ्यांनी देशात आत्महत्या केली आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये २०१५ मध्ये एकूण ३२२८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहे. २००१ पासून सर्वात जास्त आत्महत्या २०१५ या वर्षात झाल्या. दिवसेंदिवस होणाऱ्या शेतकऱ्याच्या आत्महत्या महाराष्ट्रात सुध्दा वाढत चालल्या आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी उपाययोजना :

भारत सरकारने तसेच राज्य सरकारने शेतकऱ्यांना आधार मिळावा यासाठी आर्थिक मदत करत असते. त्या शेतकऱ्यांच्या दु:खावर फुंकर घालण्याचा प्रयत्न आर्थि साहाय्य देवुन करते परंतु सरकारने सहाय्य हे अल्पकालीन स्वरुप ठरते. एखाद्या वर्षी दुष्काळ पडला पडतो त्यावर सरकार शेतकऱ्यांना मदत करते परंतु परत दुष्काळ पडला तर काय? म्ह सरकारने दीर्घकालीन उपाययोजना करणे महत्वाचे आहे तसेच शेतकऱ्यांनी सुध्दा साथ देणे गरजेचे आहे तरच आत्महत्या सत्र थांबवता येवु शकते. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना कायमस्वरुपी प्रतिबंध घालण्यासाठी काही उपाययोजना पुढील प्र

शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे :

शेतकऱ्यांना प्रशिक्षण शासन देत नाही असे नाही तर खुप मोठया प्रमाणात प्रशिक्षण केंद्र उभारुन शेतक कमी खर्चाची पिके घेवून जास्तीत जास्त उत्पन्न कसे मिळेल याबाबत त्याचबरोबर आपल्या जमिनीची मशागत करावी, जमिनीची पोत ओळखून त्यामध्ये कोणती पिके घेणे सोयीस्कर ठरेल त्यामुळे दुष्काळाच्या परिस्थितीत सुध्दा पीकप करण्यास शेतकऱ्यांना प्रेरीत करावे जेणे करुन त्यांची आर्थिक हानी टाळता येईल. तसेच सर्व शेतकऱ्यापर्यंत तंत्रज्ञा पुरवठा कसा होईल, यासाठी शासनाने प्रयत्न करायला हवे त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना पूर्णपणे आळा बसु श

शेती क्षेत्राबरोबर इतर उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध करुन देणे :

ग्रामिण भारताची कृषी ही अर्थव्यवस्थेचा कणा जरी असला तरी दिवसेंदिवस पडत जाणारा दुष्काळ त्या शेतकऱ्यांची पूर्णपणे वाताहत होत चालली आहे. ती वाताहत रोखण्यासाठी शेतीक्षेत्राबरोबर नवीन रोजगार प्राप्ती आवश्यक असणारी कौशल्ये प्राप्त करण्यासाठी सरकारने प्रयन्त करणे गरजेचे आहे. तसेच ग्रामीण भागात अल्पभू शेतकरी व भूमिहीन शेतकऱ्यांना दुष्काळाच्या परिस्थितीत रोजगार प्राप्ती कार्यक्रम सुरु करुन त्यांची बेकारी हटवून त आत्महत्येपासुन परावृत्त करता येवु शकते. त्यासाठी शेतीक्षेत्राबरोबर इतर उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध करुन देणे अत्यंत आव आहे.

शेतकऱ्यांनी पारंपारीक शेतीपध्दतीचा त्याग करणे :

भारतीय शेती निसर्गावर अवलंबून आहे आणि निसर्गाचा लहरीपणा सुरु असल्यामुळे शेतकऱ्यांना दुष्का सामना करवा लागतो. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे प्रभावी व्यवस्थापन होणे गरजेचे आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी सिं व्यवस्थेत बदल केल्यास पाण्याचा योग्य वापर करुन शेतीतून जास्त उत्पन्न घेता येवु शकते. त्यासाठी पारंपारीक सिं पध्दतीत बदल करुन ठिबक पध्दती शेतीत करणे आवश्यक आहे. सरकारने त्यासाठी आर्थिक मदत करतेच पण त्याच शेततळी, नालाबंडीग, तलाव, यासारख्या उपाययोजना करुन जमिनीमध्ये पाणी साठविले जाईल व त्यामुळे शेतीतून घेतले गेल्यास शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखता येवु शकेल.

शेतीमालाला हमीभाव देणे :

शेतकऱ्यांनी आपल्या शेतीतून उत्पादित केलेल्या मालाला अपेक्षित भाव मिळावा यासाठी सरकारने बाजार यंत्र सुधारणा करावी तसेच दलालाची साखळी कमी करणे गरजेचे आहे. आज महाराष्ट्रात शेतकऱ्यांना आडत स्वरुपात नु सहन करावे लागत आहे. शेतकऱ्यांनी पिकवलेल्या मालाला योग्य भाव मिळाल्यास शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा त्यातु शकेल. त्यासाठी शेतीमालाला हमीभाव ठरवून देणे शासनाचे प्रथम कार्य आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थीक अडच होवून आत्महत्या संपुष्टात येईल.



Scanned by CamScanner

शेतकऱ्यांनी अवाजवी खर्च थांबविणे :

राज्यात पडणारा दुष्काळ, गारपीट यामुळे शेतकऱ्यांना जीवन जगणे असहाय्य झाले आहे. त्यातच शेतकरी वर्ग प्रतिष्ठा जोपसण्यासाठी सामाजिक, धार्मिक, विविध सण, उत्साह, लग्न, व्यसनावर खुप मोठया प्रमाणात अवातवी खर्च करतात त्यामुळे आजही ग्रामीण भागात या सर्व बाबीवर खर्च होत असल्यामुळे शेतकरी कर्जाच्या विळाख्यात सापडल्या जातो त्यामुळे कर्जबाजारीपणाच्या चक्रात अडकल्यामुळे त्यातून बाहेर पडणे शक्य होत नाही त्यामुळे बऱ्याचदा उदारनिर्वाह भागविण्यासाठी तसेच कुटूंबाच्या मुलभूत आवश्यकता भागविल्या जात नाही. त्यामुळे व्यसनाच्या आहारी जावून नशेमध्ये बऱ्याचदा नैराश्यातून आत्महत्या करतात. नैराश्य येवू नये म्हणून शेतकऱ्यांनी अवाजवी खर्च थांबविणे आवश्यक आहे किंवा त्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे गरजेचे आहे.

सारांश :

आज भारतात शेती करणे जुगार झाला आहे. दरवर्षी येणाऱ्या नैसर्गिक संकटामुळे शेतकरी बेजार होऊन आत्महत्येचे पाऊल उचलतो. केंद्र सरकार व राज्य सरकार आपापल्या परीने शेतकऱ्यांना मदत करण्याचा प्रयत्न करतात परंतु ती मदत तुटपूंजी स्वरुपाची असते. आज राज्यात वर्षानुवर्षे दुष्काळ पडत आहे. शासन तात्पुरत्या स्वरुपाची मदत करते परंतु दीर्घकालीन सुधारणा करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी पावले उचललेही परंतु ती पावले व्यापक स्वरुपात असणे आवश्यक आहे. त्यासाठी लोकसहभाग असणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना एखाद्या वर्षी शेतीतुन उत्पन्न कमी मिळाले तर पर्यायी उत्पन्नाचे साधने उपलब्ध करुन देणे जेणेकरुन आपल्या कुटूंबाच्या गरजा पूर्ण करण्यात शेतकरी यशस्वी होईल त्यामुळे शेतकरी आत्महत्या करण्यापासुन परावृत्त होईल. आत्महत्या ही वरवर पाहता वैयक्तिक वाटत असली तरी विशिष्ट सामाजिक परिस्थिती व्यक्तीला आत्महत्या करण्यास बाहय करते. म्हणून आत्महत्या ही एक सामाजिक घटना आहे.

संदर्भ :

१. तिवारी संजय, कोष्टा शैलप्रभा, ग्रामिण विकास, ओमेगा पब्लिकेशन्स, नई दिल्ली, २००९.
२. सक्सेना, दिपाली, भारतीय युवाओ मे आत्महत्या की बढती प्रवृत्ति रोशनी पब्लिकेशन्स, कानपुर २०११.
३. दोषी एस.एल., जैन पी.सी., प्रमुख समाजशास्त्रीय विचारक, रावत पब्लिकेशन्स, जयपूर, २०१३.
४. बुलेटिन ऑफ युनिक ॲकडमी मार्च २०१५.
५. द हिंदू, २१ डिसेंबर २०१५.
६. **www.indianexpress.com**

Scanned by CamScanner